मन गबाळं बावळं
पोरकट, खोडसाळ
कोणी नका समजावू
काय करू?  वेड बाळ ||
दोन श्वासांचं आयुष्य
कसे घालवी बेकार
एक श्वास उणा झाला
तरी करे ना विचार ||
द्वाड असे, लाड केले
तरी नाही,सुज्ञ झाले
कणभर मोहासाठी
मणभर दु:ख केले ||
अनुभव,आता तरी
शांती,आत खोलवरी
सोड जुने खुळेपण
समाधान खरोखरी ||
-- संध्या रानडे